नोंदणी क्र.: एन.एस.के./एन.एस.के./आर.एस.आर/सी.आर. १५३२/२००४

सहकारातून समृद्धीकडे

गोदामृत अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. सिडको, नाशिक

# गोदामृत

विना सहकार नाही उद्धार



२०२५-२०२६

## अर्बन को. ऑप.क्रेडीट सोसायटी लि.

शॉप नं. २६,२७ मधुरा टॉवर उंटवाडी नाशिक-८, फोन : ०२५३-२९७९३४०,९४०३४७९३४०







## २२ वा वार्षिक अहवाल



# गोदामृत अर्बन को. ऑप.क्रेडीट सोसायटी लि.

शॉप नं. २६,२७ मधुरा टॉवर उंटवाडी नाशिक-८, फोन : ०२५३-२९७९३४०,९४०३४७९३४०

## * विद्यमान संचालक मंडळ *



**श्री. प्रमोद दिनकर पाटील**
चेअरमन



**श्री. नितीन मुरलीधर बोरोले**
व्हा. चेअरमन



**श्री. अनिल रामा पाटील**
सेक्रेटरी



श्री. विलास कृष्णा ढाके
खजिनदार



श्री. माधव चिंतामण भोळे
संचालक



श्री. देवेंद्र रामकृष्ण चौधरी
संचालक



श्री. जितेंद्र ओंकारदास बोरा
संचालक



श्री. संजीव भिका पगारे
संचालक



श्री.संतोष गोविंद आव्हाड
संचालक



सौ. रत्नमाला गणेश फालक
संचालिका



सौ. आशा सुरेश चौधरी
संचालिका



श्री. रघुवीर पुंडलिक फालक
तज्ञ संचालक



ॲड. प्राची निलेश चाळीसगावकर
तज्ञ संचालिका



श्री. भागवत प्रकाश भोळे
कार्यलक्षी, संचालक



श्री. कुणाल युवराज भारंबे
मॅनेजर



सौ. सरला अनिल नेहेते
कर्मचारी



सौ. लिना राजेश नेमाडे
कर्मचारी



सौ.चैताली महेश भोळे
कर्मचारी



सौ. वैशाली दीपक फेगडे
कर्मचारी

# विद्यमान संचालक मंडळ

| अ.नं | संचालकांचे नाव | पद | फोन नं. |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रमोद दिनकर पाटील | चेअरमन | ८३९०७८६७८१ |
| २ | श्री. नितीन मुरलीधर बोरोले | व्हा.चेअरमन | ९८८१०१७९६६ |
| ३ | श्री. अनिल रामा पाटील | सेक्रेटरी | ९८८११३७७६९ |
| ४ | श्री. विलास कृष्णा ढाके | खजिनदार | ९४२३४८५११४ |
| ५ | श्री. माधव चिंतामण भोळे | संचालक | ९४२०४८५२८८ |
| ६ | श्री. देवेंद्र रामकृष्ण चौधरी | संचालक | ९३७१६७८३६३ |
| ७ | श्री. जितेंद्र ओंकारदास बोरा | संचालक | ८९७५२०३२०० |
| ८ | श्री. संजीव भिका पगारे | संचालक | ९४२१५०८०३७ |
| ९ | श्री. संतोष गोविंद आव्हाड | संचालक | ९४२१५०९७०७ |
| १० | सौ. आशा सुरेश चौधरी | संचालिका | ९४२३९१२५७८ |
| ११ | सौ. रत्नमाला गणेश फालक | संचालिका | ९६०४८४०३१५ |
| १२ | श्री. रघुवीर पुंडलीक फालक | तज्ञ संचालक | ९२२५१०२२३५ |
| १३ | ॲड. सौ. प्राची निलेश चाळीसगावकर | तज्ञ संचालिका | ९९२२२०९०८३ |
| १४ | श्री. भागवत प्रकाश भोळे | कार्यलक्षी संचालक | ९४०३४७९३४० |




अहवाल वर्षात संस्थेचे सभासद, देशातील राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, कला व साहित्य क्षेत्रातील मान्यवर तसेच देशाच्या सीमा रक्षणासाठी, ऐक्यासाठी अविश्रांत लढून प्राणार्पण केलेल्या शहीद वीर जवानांना तसेच आपल्या गोदामृत सोसायटीचे दिवंगत सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक जे काळाच्या पडद्याआड गेले त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात ही सभा सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना.



# अध्यक्षीय मनोगत

**आदरणीय सभासद बंधु भगिनींनो,**

**सप्रेम नमस्कार,**

मला अत्यंत आनंद व अभिमान वाटतो की, आपल्या गोदामृत पतसंस्थेने आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये सर्वांचा विश्वास, सहकार्य आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर उल्लेखनीय प्रगती साधली आहे. जागतिक स्तरावर युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक अस्थिरता, वाढती महागाई आणि मंदीची शक्यता अशा अनेक आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झालेल्या असतानाही आपल्या संस्थेने स्थैर्य, शिस्त आणि विश्वास यांचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण केले आहे.

या आर्थिक वर्षात संस्थेच्या ठेवींमध्ये अतिशय चांगली वाढ झाली असून संस्थेचा आर्थिक पाया अधिक मजबूत झाला आहे. संस्थेने समाधानकारक नफा प्राप्त केला असून सभासदांच्या हिताचा विचार करून यावर्षीही १२ % लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे, ही आनंदाची बाब आहे. तसेच संस्थेच्या आर्थिक शिस्तीची, पारदर्शक कारभाराची आणि सक्षम व्यवस्थापनाची दखल घेत लेखापरीक्षणामध्ये संस्थेला अ वर्ग प्राप्त झाला आहे. हा मान संस्थेच्या सर्व सभासद, संचालक, व कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांचा गौरव आहे.

संस्थेचा Gross NPA व Net NPA नियंत्रित आणि समाधानकारक पातळीवर आहे. संस्थेची गुंतवणूक धोरणे सुरक्षित, संतुलित व दूरदृष्टी ठेवून आखण्यात आलेली आहेत. त्यामुळे भविष्यातील कोणतीही आर्थिक मंदी किंवा अस्थिर परिस्थितीला सक्षमपणे सामोरे जाण्याची ताकद आपल्या संस्थेमध्ये आहे, असा माझा ठाम विश्वास आहे.

तथापि, या आर्थिक वर्षात ठेवींच्या तुलनेत कर्ज वितरण अपेक्षित प्रमाणात वाढलेले नाही. आगामी काळात सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व उत्पादक कर्जवाटप वाढविण्यावर संस्था विशेष भर देणार आहे. संस्थेने ९८% कर्ज तारणावर दिलेली आहे हि संस्थेची जमेची बाजू आहे.

सभासदांनी संस्थेशी आर्थिक व्यवहार वाढविल्यास संस्थेची आर्थिक ताकद अधिक मजबूत होईल आणि त्याचा लाभ पुन्हा सभासदांनाच अधिक चांगल्या सेवा, लाभांश आणि विविध योजनांच्या माध्यमातून मिळत राहील.

संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासद, ठेवीदार, ग्राहक, संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांचे योगदान अत्यंत

मोलाचे आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच संस्था यशस्वीपणे पुढे वाटचाल करीत आहे. भविष्यातही पारदर्शकता, सुरक्षितता, विश्वास आणि सभासदहित या तत्त्वांवर संस्था अधिक सक्षम व प्रगत करण्याचा आमचा निर्धार कायम राहील.

आपल्या गोदामृत अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा प्रवास हा सातत्यपूर्ण प्रगती, सभासदांचा विश्वास आणि सहकार्य यांच्या भक्कम पायावर उभा आहे. संस्थेने आपल्या कार्याची सुरुवात प्रभाग कार्यक्षेत्रात केली आणि अल्पावधीतच विश्वासार्ह आर्थिक सेवा देत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यानंतर महानगरपालिका कार्यक्षेत्राचा विस्तार साध्य करत संस्थेने आपल्या सेवांचा लाभ अधिक व्यापक स्तरावर पोहोचविला. पुढे तालुका कार्यक्षेत्राची मान्यता प्राप्त करून संस्थेने विकासाचा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला.

आज अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हणजे संस्थेने जिल्हा कार्यक्षेत्र विस्तारासाठी प्रस्ताव सादर केला असून, लवकरच जिल्हा कार्यक्षेत्राची मान्यता प्राप्त होईल, असा विश्वास आहे. हा विस्तार संस्थेच्या प्रगतीच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार असून, प्रत्येक सभासदासाठी गौरवाची बाब आहे.

सहकार ही केवळ आर्थिक देवाणघेवाणीची व्यवस्था नसून परस्पर विश्वास, सहभाग, बांधिलकी आणि सामूहिक प्रगती यांचे सशक्त माध्यम आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि बदलत्या आर्थिक परिस्थितीत सुरक्षित बचत व विश्वासार्ह आर्थिक व्यवहार यांचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

यासाठी सर्व सभासदांना नम्र आवाहन आहे की, त्यांनी आपल्या संस्थेमध्ये नियमित ठेवी ठेवून बचतीची सवय अधिक बळकट करावी. तसेच विविध आर्थिक गरजांसाठी कर्ज व्यवहार करताना आपल्या संस्थेलाच प्रथम प्राधान्य द्यावे. सभासदांचा वाढता सहभाग आणि विश्वास हेच संस्थेच्या उज्ज्वल भवितव्याचे खरे बळ आहे.

आपला विश्वास हीच आमची प्रगती या ब्रीदवाक्याला साकार करत गोदामृत अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी भविष्यातही अधिक सक्षम, पारदर्शक आणि सभासदाभिमुख सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहील.

**आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.**

**आपला स्नेहांकित**
**चेअरमन**
**गोदामृत अर्बन को ऑप.**
**क्रेडीट सो.लि.नाशिक**

**! सभासद हा संस्थेचा आधारस्तंभ आहे!**

# गोदामृत अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि.

**शॉप नं.२६ व २७ मधुरा टॉवर, उंटवाडी, नाशिक**

## २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (सभासदांसाठी)

**सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनींनो,**

गोदामृत अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि. नाशिक या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष श्री. प्रमोद दिनकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. ०८ /०८ /२०२६ या रोजी दुपारी ४.३० वाजता सातपुडा विकास मंडळ प्लॉट नं. एस एफ १ अे एन एच .ई-३, भाद्रपद सेक्टर,सेंट जोसेफ लॉरेन्स हायस्कूल जवळ, नवीन नाशिक-४२२००९ या ठिकाणी आयोजित केलेली आहे . सभेमध्ये खालील विषय पत्रिकेतील विषयांवर चर्चा केली जाईल तरी सर्व संभासदांनी वेळेवर उपस्थित राहणे ही विनंती.

### सभेपुढे येणारे विषय

१. दि. ०२ /०८ /२०२५ या रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२५ -२०२६ चा लेखापरीक्षण अहवाल तसेच सन २०२५ -२०२६ चे नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यास वाचून मान्यता देणे.
३. सन २०२५ -२०२६ या अहवाल सालातील नफा विभागणीस मंजूरी देणे.
४. सन २०२५ -२०२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२६ -२०२७ या आर्थिक वर्षाकरीता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६. सन २०२६ -२०२७ या वर्षासाठी अंतर्गत लेखापरीक्षक व वैधानिक लेखपरिक्षकाच्या निवडीस मान्यता देणे.
७. नियामक मंडळाने लागू केलेली नवीन उपविधी स्वीकरण्यास मान्यता देणे
८. १०० टक्के तरतूद असलेली संशयित व बुडीत कर्जखाती वसुलीचे अधिकार अबाधित ठेवून निर्लेखित करण्यासाठी मंजूरी घेणे.
९. संचालक मंडळ सदस्य व नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
१०. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे.
११. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

नाशिक — **श्री. भागवत प्रकाश भोळे**

दि. २२ /७ /२०२६ — (कार्यलक्षी संचालक)

**विशेष सूचना :**

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पोटनियमातील तरतुदीप्रमाणे सदर सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल.
२. ज्या सभासदांना वार्षिक अहवाल कामकाजासंबंधी काही सूचना द्यावयाच्या असतील अशा सभासदांनी त्या लेखी स्वरूपात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात दि. ०३ /०८ /२०२६ पूर्वी सादर कराव्यात. आयत्या वेळी आलेल्या सूचना विचारात घेतल्या जाणार नाही.

# २२ वा वार्षिक अहवाल २०२५ -२०२६

**सन्माननीय सभासद बंधु–भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी मी आपल्या सर्वांचे हार्दिक स्वागत करतो, मी व माझे संचालक मंडळ, कर्मचारीवर्ग व सहकारी यांचेवर असलेल्या दृढ विश्वासामुळे संस्थेच्या आर्थिक प्रगतीत वाढ झालेली आहे आणि अशीच प्रगती होत राहील असे मी आश्वासन देतो. माझे सहकारी संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांनी सुध्दा संस्था प्रगती पथावर नेण्यासाठी जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्याचप्रमाणे संस्थेचे आधारस्तंभ असलेले सभासद, ठेवीदार व कर्जदार यांनीसुद्धा खूप मोलाचे सहकार्य केलेले आहे. यामुळे संस्थेच्या झालेल्या प्रगतीचा २०२५ -२०२६ या आर्थिक वर्षातील कामकाजाचा अहवाल पुढीलप्रमाणे -

**१) सभासद व भागभांडवल :** सभासदांचा वाढता सहभाग आणि भागभांडवलातील सातत्यपूर्ण वाढ हि संस्थेच्या प्रगतीची साक्ष आहे.संस्थेची खरी संपत्ती तिचे सभासद आहेत तर भागभांडवल हा तिच्या विकासाचा मजबूत पाया आहे.प्रत्येक नवीन सभासद म्हणजे संस्थेच्या विकासाचा नवा टप्पा असतो. आपल्या संस्थेची सन २०२४ -२०२५ मध्ये सभासद संख्या ३७१२ होती. या आर्थिक वर्षामध्ये म्हणजेच सन २०२५ -२०२६ मध्ये सभासद संख्या ३८९५ आहे. म्हणजेच अहवाल वर्षामध्ये सभासद संख्येमध्ये १८३ ने वाढ झालेली आहे. तसेच संस्थेचे भागभांडवल सन २०२४-२०२५ मध्ये १,१७,९३,८०० .००रु. इतके होते. या आर्थिक वर्षात म्हणजेच सन २०२५ -२०२६ मध्ये संस्थेचे भागभांडवल १,२४,०७,६००.०० रु. आहे. याचाच अर्थभागभांडवलात ६,१३,८००.००रु. नी वाढ झालेली आहे.

**भागभांडवलात झालेली वाढ खालीलप्रमाणे–**




**२) स्वनिधिः–.** स्वनिधीतील सातत्यपूर्ण वाढ हि संस्थेच्या सुयोग्य नियोजनाची आणि आर्थिक शिस्तीची साक्ष आहे. सुरक्षितता,स्थैर्य आणि प्रगती यांचा पाया म्हणजे संस्थेचा स्वनिधीस्वनिधीची भक्कम उभारणी हि संस्थेच्या सुरक्षित आणि शाश्वत प्रगतीची गुरुकिल्ली आहे.वाढता स्वनिधी संस्थेला आत्मनिर्भरतेकडे आणि अधिक सक्षम भविष्यात घेऊन जात आहे.स्वनिधी मध्ये नवीन आर्थिक परीपत्रकीय सूचनेनुसार स्वनिधी म्हणजे फक्त भाग भांडवल +राखीव निधी + इमारत निधी यांचाच सहभाग करण्यात आलेला आहे.बाकी इतर घटक वगळण्यात आलेले आहे.आपल्या संस्थेच्या स्वनिधी मध्ये झालेली वाढ आपल्याला खालीलप्रमाणे दिसून येत आहे.



**३) ठेवी :-** ठेवींची भरभराट म्हणजेच विश्वासाची उंच भरारी आणि प्रगतीची अखंड गाथा. आपल्या संस्थेच्या ठेवीमध्ये झालेली भक्कम वाढ हि संस्थेच्या आर्थिक सामर्थ्याची ओळख आहे.संस्थेच्या वाढत्या ठेवी म्हणजे सभासदांचा संस्थेवरील वाढता विश्वास आहे. सभासदांचा विश्वास जिंकत,ठेवीच्या वाढीसह संस्थेची यशस्वी वाटचाल आपल्याला खालीलप्रमाणे दिसून येईल.




**४) कर्ज :-** कर्जवाटपातील प्रमाणापेक्षा कर्जाची गुणवत्ता आणि परतफेडीची सुरक्षितता यांना संस्थेने अधिक प्राधान्य दिले. त्यामुळे संस्थेची आर्थिक शिस्त आणि दीर्घकालीन स्थैर्य अधिक बळकट झाले आहे. चालू आर्थिक वर्षात संस्थेच्या कर्जवाटपात काही प्रमाणात घट  झाली असली तरीही संस्थेने कर्जवाटप करताना आर्थिक शिस्त, जोखीम व्यवस्थापन आणि परतफेडीची क्षमता यांना प्राधान्य दिले. दर्जेदार कर्जवाटप, थकबाकी नियंत्रण आणि संस्थेच्या हिताचा विचार करूनच कर्जप्रकरणांना मंजुरी देण्यात आली. आगामी काळात अधिकाधिक पात्र सभासदांना जलद,पारदर्शक आणि विश्वासार्ह कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कटीबद्ध आहे. आपल्याला कर्ज वाटपातील वाढ खालीलप्रमाणे दिसून येईल.




**५) गुंतवणूक :-** गुंतवणूक हि केवळ आर्थिक व्यवहार नाही तर उज्ज्वल भविष्याची दूरदृष्टी आहे.संस्थेच्या प्रत्येक गुंतवणुकीमागे सभासदांच्या हिताचे भक्कम संरक्षण आहे.संस्थेच्या गुंतवणुकीचा प्रत्येक निर्णय हा संस्थेच्या उज्ज्वल भविष्याची खात्री देतो गुंतवणुकीतील वाढ हि संस्थेच्या सक्षम आर्थिक व्यवस्थापनाची साक्ष आहे..संस्थेच्या गुंतवणुकीत झालेली वाढ खालील प्रमाणे दिसून येईल.



**६) नफा :–** सभासदांचा विश्वास,कर्मचाऱ्यांचे समर्पण आणि व्यवस्थापनाची दूरदृष्टी यामुळे संस्थेने नफ्यात सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय वाढ नोंदविलेली आहे.वाढता नफा ही संस्थेच्या सक्षम व्यवस्थापनाची आणि सभासदांच्या विश्वासाची फलश्रुती आहे. संस्थेचा वाढता नफा म्हणजे प्रगती, स्थैर्य आणि समृद्धीचा विश्वासार्ह मार्ग. सुयोग्य नियोजन,आर्थिक शिस्त आणि सभासदांचे सहकार्य यांचे फलित म्हणजे वाढता नफा. संस्थेचा वाढता नफा आपल्याला खालीलप्रमाणे दिसून येईल.




**७) राखीव निधी :–** राखीव निधीची भक्कम उभारणी म्हणजे आर्थिक सुरक्षितता,संस्थात्मक स्थैर्य आणि सभासदांच्या विश्वासाचा विजय. आर्थिक अडचणीच्या काळात राखीव निधी संस्थेला सक्षमपणे उभे राहण्याची ताकद देतो.राखीव निधी हा संस्थेच्या आर्थिक सुरक्षिततेचा संरक्षक कवच आहे. सभासदांच्या हितसुरक्षेसाठी,आर्थिक जोखीम कमी करण्यासाठी आणि संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी राखीव निधीची सातत्यपूर्ण वाढ अत्यंत आवश्यक आहे.आपल्या संस्थेच्या राखीव निधीत झालेली वाढ आपल्याला खालीलप्रमाणे दिसून येईल.




**८) थकबाकी :–** थकबाकी कमी करणे हे केवळ वसुलीचे उद्दिष्ट नसून संस्थेची आर्थिक गुणवत्ता,सभासदांचा विश्वास आणि भविष्यातील विकास अधिक भक्कम करण्याची अखंड प्रक्रिया आहे.संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे थकबाकी कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात आल्या. थकीत कर्जदारांशी नियमित संपर्क, पाठपुरावा, प्रत्यक्ष भेटी तसेच आवश्यक त्या कायदेशीर उपाय योजनांच्या माध्यमातून वसुली प्रक्रियेला गती देण्यात आली.वसुलीतील यश हे संस्थेच्या आर्थिक आरोग्याचे प्रतिबिंब आहे.आपण भरलेला प्रत्येक हप्ता हा केवळ थकबाकी कमी करत नाही तर संस्थेच्या प्रगतीला गती देतो, विश्वास दृढ करतो आणि सहकाराची परंपरा अधिक समृद्ध करतो.संस्थेची उभारणी विश्वासावर झाली आहे, त्या विश्वासासाला नियमित परतफेडीची जोड देऊन आपण संस्थेच्या उज्ज्वल भविष्यात मोलाचे योगदान देऊया. **आम्ही एकच सांगतो तुम्ही विश्वासाने घेतलेले कर्ज, अभिमानाने फेडा.**

**९) निरस्त करावयाची कर्जे:–** सर्व कायदेशीर मार्गाने वसुलीचे प्रयत्न करून सुद्धा काही थकीत कर्जखाती वसूल झालेली नाही त्यामुळे वसूल न झालेली अशी काही कर्ज खाती निरस्त करण्याचा प्रस्थाव आपणपुढे ठेवत आहे. ही रक्कम निरस्त केल्या नंतरही पतसंस्थेचे वसुलीचे अधिकार अबाधित राहतील. कोणत्याही प्रकारची कारवाई थांबविण्यात येणार नाही. ज्याप्रमाणे घर स्वच्छ

ठेवण्यासाठी घरातील कचरा बाहेर टाकावा लागतो त्याचप्रमाणे आपला ताळेबंद स्वच्छ करण्यासाठी अशी कर्जे निरस्त करावी लागतात.आपण संशयित बुडीत कर्ज खाती असलेली ही कर्जप्रकरणे निरस्त करण्यास मान्यता द्यावी.

**१०) संचालक व संचालक नातेवाईक कर्ज :–** मा. संचालक मंडळाचे कोणत्याही नातेवाईक कर्ज देण्यात आलेले नाही. तसेच संचालक कर्जाची कुठल्याही प्रकारची थकबाकी नाही.

**११) नफा वाटणी :–**

| जमा तपशील | रक्कम | नावे तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| नफा | ५४,००,०८३.३८ | राखीव निधी २५% | १३,५०,०२१.०० |
| | | लाभांश मार्च २०२६ अखेर भागभांडवलावर १२ % | १४,३९,०२३.०० |
| | | धर्मदाय निधी | २५,०००.०० |
| | | संशयित बुडीत निधी | १७,८६,०३९.०० |
| | | सभासद कल्याण निधी | ५०,०००.०० |
| | | कर्जदार विमा योजना | १,००,०००.०० |
| | | जनकल्याण निधी | ५०,०००.०० |
| | | उर्वरित नफा इमारत निधीत वर्ग | ६,००,०००.३८ |
| | **५४,००,०८३.३८** | **एकूण** | **५४,००,०८३.३८** |

**१२) वार्षिक उलाढाल :–** संस्थेच्या सर्व वास्तविक आकडेवारीचा आलेख आपल्यासमोर ठेवलेला आहे. तरी दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधी मध्ये संस्थेने रक्कम १४१,८७,२१,०९५.०६ इतकी उलाढाल केलेली आहे.

**१३) संचालक मंडळ सभा :–** जेथे एकता,तेथे सुरक्षितता तत्वानुसार आपल्या संचालक मंडळाने एकमताने सभेतील विषयांना मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीत सतत वाढ होताना दिसत आहे. आपल्या संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा झालेल्या असून समिति सभा १४ झालेल्या आहेत.

**१४) आभार :–** गोदामृत पतसंस्थेचा प्रत्येक टप्पा यशस्वी ठरला, कारण प्रत्येक सभासदाने निष्ठेने साथ दिली,ही साथ अशीच राहू द्या हीच अपेक्षा कारण आपला विश्वास हेच आमच बळ आहे.संस्थेच्या वाढत्या प्रगतीचे श्रेय सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांच्या संस्थेवरील अढळ विश्वासाला आहे. म्हणून या सर्वांचे मी आभार मानतो. आपण सर्वांनी आजपर्यंत जे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

**आपला स्नेहांकीत**

**श्री. प्रमोद दिनकर पाटील (चेअरमन)**

## नफा तोटा पत्रक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६

| ३१ मार्च २०२५ | खर्च | ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|
| **२,०९,२१,४९०.००** | **ठेवीवर दिलेले व्याज** | **२,२६,९७,०६४.००** |
| **१५,४४,५११.००** | **पगार** | **१७,२३,९४१.००** |
| ४८,२२०.०० | प्रवास खर्च | ४८,०००.०० |
| १,३९,७८६.०० | किरकोळ खर्च | ८२,८४२.०० |
| १४,९८४.०० | जाहिरात खर्च | ७९,९९९.०० |
| ३०,३८५.०० | टेलीफोन खर्च | ४५,४५७.०० |
| २,८४,७६९.०० | घसारा | ७,६२,२५५.०० |
| १,९२,३४४.०० | कार्यालय भाडे | ०.०० |
| ८४,०१४.०० | ऑडीट फी | १,१९,७४१.०० |
| ०.०० | टॅक्स ऑडीट फी | २०,०००.०० |
| ९३,६००.०० | बोनस | १,२४,९००.०० |
| ६१,०६५.०० | सॉफ्टवेअर ए एम सी | ५७,१९३.०० |
| ६८,३३५.०० | वार्षिक सभा खर्च | ८०,६५५.०० |
| १,११,८०६.८१ | बँक चार्जेस | ३५,७७३.४० |
| २,५००.०० | प्रोफेशनल टॅक्स | २,५००.०० |
| ६८,६३८.०० | आवर्त ठेव कमिशन | ९३,२५२.०० |
| ६९,५००.०० | लाईट बिल | ५५,४१०.०० |
| ५४,२६१.०० | अहवाल खर्च | ६६,१४३.०० |
| १६,८५,७२७.०० | कमिशन | १७,७९,७६०.०० |
| ८,९३८.०० | संगणक देखभाल | ४१,८१५.०० |
| २०,०००.०० | कन्सल्टिंग खर्च | २१,२००.०० |
| ४१,४१४.०० | प्रशिक्षण खर्च | ५६,११६.०० |
| २२,१९२.०० | पोस्टेज | २१,८८१.०० |
| ३८,७८३.०० | दिवाळी खर्च | ३८,८५४.०० |
| ०.०० | लॉकर रेंट | ६,४९०.०० |
| ४५,३१२.०० | कॅलेंडर खर्च | ४४,८४०.०० |
| ७०,१५०.०० | प्रिंटींग आणि स्टेशनरी | ७४,८९९.०० |
| १७,१५८.०० | मनी टान्झेक्शन इन्सुरन्स | २७,२२८.०० |
| ७३,०००.०० | स्टॅंडड ॲसेट प्रोविजन | ६५,०००.०० |
| १,२८,७००.०० | वकील फी | ०.०० |
| २०,६४०.०० | वर्धापन दिन खर्च | ०.०० |
| २२,५०.०० | नाशिक जि.पत फेड वर्गणी | १,२५०.०० |
| ०.०० | प्रॉपर्टी टॅक्स | ५,०००.०० |
| २८,८७५.०० | संचालक मिटिंग भत्ता | ३४,१००.०० |
| ३,१८६.०० | जीएसटी | ८,६८८.०० |
| ८८०.०० | टी डीएस लेट पेमेंट चार्जेस | ०.०० |

उर्वरित पुढील पानावर

## नफा तोटा पत्रक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६

| ३१ मार्च २०२५ | खर्च | ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|
| ०.०० | १०१ सॉफ्टवेअर | ३३,५००.०० |
| ९,८६४.०० | पी एफ इन्शुरन्स | १०,२५०.०० |
| २१,०१२.०० | स्टाफ युनिफोर्म | ०.०० |
| १,०३,५५०.०० | कर्मचारी पी एफ | १,०२,३११.०० |
| १८,५००.०० | बँक वेबसाईट | २,०००.०० |
| ०.०० | कर्मचारी शुअरेटी बाँड | ८,१७८.०० |
| **१२,००,०००.००** | **इतर तरतूद** | **२८,०८,०००.००** |
| १२,००,०००.०० | एनपीए तरतूद | २७,२७,०००.०० |
| ०.०० | कर्मचारी ग्रॅज्युएटी तरतूद | ८१,०००.०० |
| **५२,२१,६४९.३७** | **नफा** | **५४,००,०८३.३८** |
| **३,२५,७१,९८९.१८** | **एकूण** | **३,६६,८६,५६८.७८** |

## नफा तोटा पत्रक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६

| ३१ मार्च २०२५ | उत्पन्न | ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|
| **२,४६,०६,०६७.७५** | **कर्जावर मिळालेले व्याज** | **२,७३,०७,७७२.००** |
| **७५,२३,८५०.५३** | **बँक मुदत ठेव गुंतवणुकीवरील व्याज** | **९०,८१,४८०.७७** |
| **४,४२,०७०.९०** | **इतर उत्पन्न** | **२,९७,३१६.०१** |
| ६,०९०.९६ | स्टेशनरी | ५,९६३.६४ |
| ३४५.०० | इतर चार्जेस | ०.०० |
| २,१०१.०० | इतर उत्पन्न | ०.०० |
| ५८,९००.०० | नोटीस फी | ४५,२००.०० |
| १२,५००.०० | इतर खर्च | ७,७००.०० |
| ३,५५,९९२.०० | प्रोसेसिंग फी | २,३५,८६१.०० |
| ३,५७०.०० | एन्ट्री फी | ०.०० |
| २७७.९४ | सर्वत्र ए टी एम कमिशन | १३९.३७ |
| २,२९४.०० | पेपर नोटीस | २,४५२.०० |
| **३,२५,७१,९८९.१८** | **एकूण** | **३,६६,८६,५६८.७८** |

**श्री. प्रमोद दिनकर पाटील**
चेअरमन

**श्री. नितीन मुरलीधर बोरोले**
व्हा. चेअरमन

**श्री. भागवत प्रकाश भोळे**
कार्यलक्षी संचालक

# ताळेबंद पत्रक : सन ३१ मार्च २०२६

| ३१ मार्च २०२५ | भांडवल व देणे | ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|
| **१,५०,००,०००.००** | **अधिकृत भाग भांडवल** | **१,५०,००,०००.००** |
| **१,१७९,३,८००.००** | **शेअर्स** | **१,२४,०७,६००.००** |
| **३,१४,६७,२६२.७५** | **एकूण निधी** | **३,८२,९०,२१७.१२** |
| ७९,८०,११७.९८ | राखीव निधी | ९४,८५,६४०.९८ |
| १,०७,५८,६८०.७७ | इमारत निधी | १,११,८५,५१२.१४ |
| १,७८,८३४.०० | जनकल्याण निधी | २,७८,८३४.०० |
| ३,३५,०००.०० | सभासद कल्याण निधी | ३,८५,०००.०० |
| १,६३,१९९.०० | धर्मदाय निधी | १,८१,१९९.०० |
| ५,५८,५७८.०० | कर्मचारी कल्याण निधी | ५,२६,१७८.०० |
| १४,९५,४२६.०० | गुंतवणूक चढ उतार निधी | १६,८३,४२६.०० |
| ७७,९३,६३६.०० | एन पी ए तरतूद | १,१५,२०,६३६.०० |
| ५,२३,३०२.०० | उत्तम जिंदगी वरील तरतूद | ५,८८,३०२.०० |
| ३,३९,८७३.०० | निवडणूक निधी | ३,३९,८७३.०० |
| ३,५५,०००.०० | कर्जदार विमा निधी | ४,५५,०००.०० |
| ३,००,०००.०० | लाभांश समीकरण निधी | ५,००,०००.०० |
| २,२७,७६९.०० | संशयित बुडीत निधी | ५,०२,७६९.०० |
| १,००,०००.०० | आपत्कालीन निधी | ३,००,०००.०० |
| ३,५७,८४७.०० | नियामक मंडळ अंशदान | ३,५७,८४७.०० |
| **२६,४५,६७,७२२.४०** | **ठेवी** | **३१,६३,१९,३९४.३०** |
| ४९,०१,०५८.५९ | बचत ठेवी | ६८,२५,८७२.४० |
| ३,८४,३१,०७५.०० | अल्पमुदत ठेव | ४,०९,९०,२९७.०० |
| ७८,०६,८९५.०० | दामदुप्पट | ९४,९२,७७०.०० |
| १३,८५,३७,४९१.०० | दीर्घ मुदत ठेव | १७,७२,५२,१४५.०० |
| ५४,९८,५७०.०० | लखपती ठेव | ५९,०४,५६८.०० |

(उर्वरित पुढील पान १४ वर)

# ताळेबंद पत्रक सन ३१ मार्च २०२६

| ३१ मार्च २०२५ | जिंदगी व येणे | ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|
| **२९,५१,७८८.१८** | **हातातील रोख शिल्लक व बँकेतील शिल्लक** | **४७,४६,४२४.००** |
| **७,३१,९४,५५५.००** | **एस एल आर गुंतवणूक** | **९,०८,५०,५०६.००** |
| १,१५,००,०००.०० | बँक ऑफ इंडिया | ८४,११,६३७.०० |
| ५२,३६,४३२.०० | शामराव विठ्ठल बँक | ७७,६३,७६०.०० |
| ३६,९३,९५२.०० | नाशिक मर्चंट बँक | ४०,५४,०३४.०० |
| १४,९०,३१२.०० | एन डी सी सी बँक | १७,८४,७२९.०० |
| ४७,४६,६८८.०० | डीएन एस बँक | ७२,६३,६१९.०० |
| ५२,२५,८२८.०० | कॉसमास बँक | ४०,००,०००.०० |
| २८,१०,५२८.०० | विश्वास बँक | ३०,३८,३८५.०० |
| १६,१८,०२१.०० | कल्याण जनता बँक | १७,२७,४००.०० |
| ५०,००,०००.०० | बॅसीन कॅथलिक बँक | ७८,६४,९१३.०० |
| ५०,२५,१४५.०० | टी जे एस बी बँक | ५९,३३,६१४.०० |
| ५२,१६,९५९.०० | आर बी एल बँक | ५६,२९,९२२.०० |
| १०,००,०००.०० | जी पी पारसिक बँक | ३०,००,०००.०० |
| ३५,८०,०००.०० | येस बँक | ५३,००,०००.०० |
| ३८,३०,५४९.०० | डीसी बी बँक | ५७,३८,७२२.०० |
| ४०,००,०००.०० | आय डी एफ सी बँक | ३५,००,०००.०० |
| २२,२०,१४१.०० | पिंपळगाव मर्चंट बँक | २४,५५,६०४.०० |
| ३०,००,०००.०० | कोटक महिंद्रा बँक | ३२,००,०००.०० |
| २०,००,०००.०० | पाचोरा पिपल बँक | २१,८४,१६७.०० |
| २०,००,०००.०० | इंडसंड बँक | ३५,००,०००.०० |
| ०.०० | चोपडा पिपल बँक | १५,००,०००.०० |
| ०.०० | जनता सहकारी बँक | ३०,००,०००.०० |
| **२,०५,६८,०७६.००** | **नाॅन एस एल आर गुंतवणूक** | **२,२८,८३,६४६.००** |
| १,००,९८,८६८.०० | एन के जी एस बी बँक | १,०५,६८,९९३.०० |
| १०,००,०००.०० | युनिटी स्मॉल फायनान्स | ०.०० |
| ३,२४,३६४०.०० | युनिटी स्मॉल फायनान्स शेअर्स | ३२,४३,६४०.०० |
| ४०,२५,५६८.०० | उज्जीवन स्मॉल फायनान्स | ४३,७१,०१३.०० |
| २२,००,०००.०० | ईक्वीटस स्मॉल फायनान्स बँक | २२,००,०००.०० |
| | महाराष्ट्र स्टेट को ऑप बँक | २५,००,०००.०० |
| १०,०५०.०० | शेअर्समधील गुंतवणूक | १०,०५०.०० |
| ६,०५०.०० | एन डीसी सी बँक शेअर्स | ६,०५०.०० |

उर्वरित पुढील पान १५ वर

पान नं. १२ वरुन

# ताळेबंद पत्रक : सन ३१ मार्च २०२६

| | | |
|---|---|---|
| ५४,९३,५६२.०० | आवर्त ठेव | ४८,०८,९८४.०० |
| २,९४,८३,२१६.०० | मासिक उत्पन्न ठेव | ३,९०,५९,९६१.०० |
| ६८,००,०००.०० | गोदामृत स्पेशल मासिक उत्पन्न ठेव | २५,००,०००.०० |
| ६०,२३,१६०.०० | दिवाळी स्पेशल ठेव | ५४,०३,७३२.०० |
| २,१५,९२,६९४.९० | अल्प बचत ठेव | २,४०,८१,०६४.९० |
| **९४,८१,२६५.६०** | **इतर देणे व तरतूद** | **४१,२९,८०२.५१** |
| १०,९४,०३४.०० | डिव्हीडंड देणे | १४,८४,८५४.०० |
| १,४९,७०८.०० | ऑडीट फी तरतूद | १,२३,४५८.०० |
| १०,०००.०० | अनामत रक्कम | १०,०००.०० |
| २१,६२३.०० | टी डीएस | ९,२५०.०० |
| १५,०००.०० | लिलाव अनामत रक्कम | २,८७,६५०.०० |
| ६६,०२,३९७.६० | एन के जि एस बी मुदत ठेव कर्ज | ५,९१,७४८.५१ |
| ४,१०,६५५.०० | कर्मचारी ग्रॅज्युएटी | ४,९१,६५५.०० |
| २,४६,३११.०० | वार्षिक सभा खर्च तरतुद | २,४६,३११.०० |
| १,६३,६४६.०० | प्रशिक्षण खर्च तरतूद | १,४६,४९४.०० |
| ६,३४८.०० | इतर येणे | ६,३४८.०० |
| १६,५४४.०० | कर्मचारी पी एफ तरतूद | ०.०० |
| २,२१,६४९.०० | वर्धापन दिन तरतूद | २,०८,६८४.०० |
| ४,००,०००.०० | रौप्य महोत्सव निधी | ४,००,०००.०० |
| १,२३,३५०.०० | बोनस तरतूद | १,२३,३५०.०० |
| **९५,६९,५५३.००** | **मुदत ठेव व्याज देणे तरतूद** | **१,११,२३,९५७.००** |
| **३,८६,२२६.००** | **थकीत व्याज तरतूद** | **१४,६४,८५४.००** |
| **५२,२१,६४९.३७** | **शिल्लक नफा** | **५४,००,०८३.३८** |
| **३३,२४,८७,४७९.२१** | **एकूण** | **३८,९१,३५,९०८.३१** |

| श्री. प्रमोद दिनकर पाटील | श्री. नितीन मुरलीधर बोरोले | श्री. भागवत प्रकाश भोळे |
|---|---|---|
| चेअरमन | व्हा. चेअरमन | कार्यलक्षी संचालक |

पान नं. १३ वरुन

# ताळेबंद पत्रक सन ३१ मार्च २०२६

| | | |
|---|---|---|
| ३,०००.०० | महाराष्ट्र स्टेट को ऑप फेडरेशन | ३,०००.०० |
| १,०००.०० | नाशिक जिल्हा नागरी सह पत फेड | १,०००.०० |
| **८८,३९,७५३.००** | **निधीची गुंतवणूक** | **१,६८,०४,३५६.००** |
| २५,४९,३६०.०० | एन डी सी सी राखीव निधी | २५,४९,३६०.०० |
| १,०००.०० | टेलीफोन डीपॉझीट | १,०००.०० |
| २०,७५,२६७.०० | बँक ऑफ महाराष्ट्र | १४,९८,२२९.०० |
| ४२,१४,१२६.०० | बँक ऑफ इंडिया राखीव निधी | ७३,२२,३४१.०० |
| ०.००. | पंजाब नॅशनल बँक | ५४,३३,४२६.०० |
| **२०,८५,७४,०११.२८** | **कर्ज** | **२३,३६,८८,३१०.२८** |
| ९,७२,४४७.०० | कॅश क्रेडीट | ७,६६,७५७.०० |
| १,२३,८४,४६६.०० | सोने तारण कर्ज | २,७१,०३,१९१.०० |
| ७७,२९,४५५.००. | सभासद कर्ज | ६९,०७,३५२.०० |
| १४,२७,९०,५९८.०० | तारण कर्ज | १४,९३,९०,४६१.०० |
| ६,४०,४३६.०० | कर्मचारी कर्ज | ७,५१,३१४.०० |
| ५,३९,७२१.०० | वाहन कर्ज | ४,१५,५२३.०० |
| ७,२३,९६२.०० | अल्प मुदत ठेव कर्ज | ७,२९,६३७.०० |
| २०,६६,०८७.०० | दीर्घ मुदत ठेव कर्ज | ३४,०९,७९८.०० |
| ४२,३५१.०० | दामदुप्पट ठेव कर्ज | ४७,७२२.०० |
| २३,५७,३४६.०० | मासिक ठेव कर्ज | २१,२६,५१०.०० |
| १,६३,१५२.०० | आवर्त ठेव कर्ज | २,०२,३५८.०० |
| ३,८१,६३,९९०.२८ | गृह कर्ज | ४,१८,३७,६८७.२८ |
| **१,१८,६५,४२२.१९** | **स्थावर मालमत्ता** | **१,११,७१,०५९.१९** |
| १२,४३,५७१.१९ | डेड स्टॉक आणि फर्निचर | ११,१४,७४४.१९ |
| ९७,८५१.०० | संगणक | ५८,५१५.०० |
| १,०५,२४,०००.०० | इमारत | ९९,९७,८००.०० |
| ६४,८३,८२३.५६ | इतर येणे व तरतूद | ८९,८१,५५६.८४ |
| ४२,२४,९६८.०० | बँक मुदत ठेव व्याज येणे तरतूद | ५४,७८,४००.०० |
| ३,८६,२२६.०० | येणे व्याज तरतूद | १४,६४,८५४.०० |
| १५,६९,६७७.५६ | गुंतवणुकीवरील टी डीएस येणे तरतूद | १७,३५,३५०.८४ |
| ३,०२,९५२.०० | इन्कम टॅक्स अपील जमा | ३,०२,९५२.०० |
| **३३,२४,८७,४७९.२१** | **एकूण** | **३८,९१,३५,९०८.३१** |

**श्री. प्रमोद दिनकर पाटील**
चेअरमन

**श्री. नितीन मुरलीधर बोरोले**
व्हा. चेअरमन

**श्री. भागवत प्रकाश भोळे**
कार्यलक्षी संचालक

## संस्थेच्या प्रगतीची वाटचाल

| तपशील | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३ -२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद | ३१५४ | ३३९१ | ३४५६ | ३७१२ | ३८९५ |
| भागभांडवल | ८९,९६,१००.०० | ९३,०३,५००.०० | १,०९,९१,३००.०० | १,१७,९३,८००.०० | १,२४,०७,६००.०० |
| ठेवी | १४,१५,७२,४३३.६२, | १७,५४,३९,३८६.२५ | २१,६६,३०,८९१.०० | २६,४५,६७,७२२.४० | ३१,६३,१९,३९४.०० |
| खेळते भांडवल | १७,९८,०५,४५३.९४ | २२,०८,७०,९९२.४१ | २७,००,७१,३१८.८१ | ३३,२४,८७,४७९.२१ | ३८,९१,३५,९०८.३१ |
| कर्ज | १२,०५,५८,६६२.५० | १३,४१,८५,८०८.७६ | १८,००,३३,८९४.७० | २०,८५,७४,०११.२० | २३,३६,८८,३१०.२० |
| राखीव निधी | ४४,०९,२७८.०० | ५१,७९,९१७.०० | ६५,४७,५८८.९८ | ७९,८०,११७.९८ | ९४,८५,६४०.९८ |
| गुंतवणूक | ५,५२,८३,९३९.०० | ८,०१,९२,५६९.०० | ८,२२,००,२०३.०० | १०,२६,१२,४३४.०० | १३,०५,४८,५५८.०० |
| नफा | २३,५०,९१२.८८ | ४१,५३,७१६.८४ | ४८,६०,१३२.६१ | ५२,२१,६४९.३७ | ५४,००,०८३.३८ |
| लाभांश दर | ९% | १२ % | १२ % | १२% | १२% |
| ठेवीवर दिलेले व्याज | १,०२,७२,००८.०० | १,१४,७४,०८१.०० | १,६८,७८,७८५.६० | २,०९,२१,४९०.०० | २,२६,९७,०६४.०० |
| कर्जावर मिळालेले व्याज | १,४६,९७,५११.०० | १,८२,८७,०३७.०० | २,१७,३५,२२२.०० | २,४६,०६,०६७.७५ | २,७३,०७,७७२.०० |
| गुंतवणूकीवर मिळालेले व्याज | ३४,०३,२१४.०० | ३७,८२,६७६.०० | ४५,९७,७२५.६० | ७५,२३,८५०.५३ | ९०,८१,४८०.७७ |
| ऑडीट वर्गवारी | अ | अ | अ | अ | अ |
| स्वनिधी | २,१२,५४,८९३.४४ | २,४५,८२,९३६.३२ | २,९१,२१,५००.१४ | ३,२८,५१,३२५.०० | ३,३०,७८,७५३.१२ |

## महत्त्वाची सूचना

१) सभासदांनी के. वाय.सी. नियमानुसार फोटो, पॅनकार्ड, आधार कार्ड व रहिवासी पुरावा दिलेला नसल्यास त्वरित संस्थेस द्यावा.

२) सभासदांनी वारसाचे नाव नोंदविले नसल्यास त्याची नोंद करुन द्यावी.

३) आपण कर्जदार असल्यास कर्जाची परतफेड वेळेवर व मुदतीत करावी. कर्जदारांनी कर्जाचे हप्ते नियमित भरुन संस्थेला सहकार्य करावे. व स्वत:वरील कायदेशीर करावाई, नोटिस खर्च, टाळावा.

४) आपण ज्यांना जामीनदार आहात ते कर्जदार वेळच्यावेळी कर्जाचे हप्ते भरतात किंवा नाही त्याकडे कृपया लक्ष द्यावे.

५) संस्थेकडून त्वरित सेवा मिळण्याच्या दृष्टीने संस्थेत येतांना पासबुक, ठेव पावत्या व इतर आवश्यक कागदपत्रे बरोबर आणावीत.

६) आपले भागप्रमाणपत्र संस्थेत तयार आहेत सभासदांना विनंती त्यांनी संस्थेतून भाग प्रमाण पत्र घेऊन जावे.

७) सभासदांनी पत्ता बदलला असल्यास त्वरित संस्थेत कळवावा.

**श्री. प्रमोद दिनकर पाटील**

(चेअरमन)

## अंदाज पत्रक २०२६-२७

| उत्पन्न तपशील | मागील अंदाज २०२५-२६ | प्रत्यक्ष उत्पन्न | पुढील अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|
| कर्जावर मिळालेले व्याज | २,८२,६४,६८८.०० | २,७३,०७,७७२.०० | ३,११,४४,७१२.०० |
| गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज | ८५,२८,३९०.०० | ८६,४३,१४३.०० | ९३,९०,३८८.०० |
| प्रोसेसिंग फी | ५,००,०००.०० | २,३५,८६१.०० | ३,००,०००.०० |
| स्टेशनरी | ६,०००.०० | ५,९६३.६४ | ६,०००.०० |
| इतर उत्पन्न | १,५०,०००.०० | ४,९३,८२९.१४ | ५,००,०००.०० |
| **एकुण उत्पन्न** | **३,७४,४९,०७८.००** | **३,६६,८६,५६८.७८** | **४,१३,४१,१००.००** |

## अंदाज पत्रक २०२६-२७

| खर्च तपशील | मागील अंदाज २०२५-२६ | प्रत्यक्ष खर्च | पुढील अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|
| ठेवीवर मिळालेले व्याज | २,४५,३३,६२८.०० | २,२६,९७,०६४.०० | २,४८,४३,०००.०० |
| पगार | १६,५०,०००.०० | १७,२३,९४१.०० | १८,६८,०००.०० |
| ऑडिट फी | १,००,०००.०० | १,१९,७४१.०० | १,८०,०००.०० |
| कमिशन | १७,००,०००.०० | १७,७९,७६०.०० | १९,००,०००.०० |
| घसारा | ९,००,०००.०० | ७,६२,२५५.०० | ९,००,०००.०० |
| एन. पी. ए. तरतूद | ५,००,०००.०० | २७,२७०००.०० | २५,००,०००.०० |
| आवर्त ठेव कमिशन | ८०,०००.०० | ९३,२५२.०० | १,००,०००.०० |
| कर्मचारी बोनस | १,२०,०००.०० | १,२४,९००.०० | १,३०,०००.०० |
| उत्तम जिंदगीवरील तरतूद | १,२०,०००.०० | ६५,०००.०० | ८०,०००.०० |
| इतर खर्च | १५,००,०००.०० | ११,०८,५७२.४० | १५,००,०००.०० |
| इतर तरतूद | ५,००,०००.०० | ८५,०००.०० | १२,००,०००.०० |
| अपेक्षित नफा | ५७,४५,४५०.०० | ५४,००,०८३.३८ | ६१,४०,१००.०० |
| **एकुण** | **३,७४,४९,०७८.००** | **३,६६,८६,५६८.७८** | **४,१३,४१,०००.००** |

**श्री. प्रमोद दिनकर पाटील**
चेअरमन

**श्री. नितीन मुरलीधर बोरोले**
व्हा. चेअरमन

**श्री. भागवत प्रकाश भोळे**
कार्यलक्षी संचालक

**महाराष्ट्र शासन**

# वैधानिक लेखापरिक्षण अहवाल

**(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ८१(५ ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा)**

आम्ही गोदामृत अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी लि नाशिक या संस्थेचा सोबत जोडलेला दि.३१.०३.२०२६ चा ताळेबंद सन २०२५-२०२६ या सहकारी वर्षांचे नफा तोटा पत्रका लेखापरिक्षण केले. ही आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षण संस्था व्यवस्थापकाने तयार केलेल्या आर्थिक पत्रकार मत प्रदर्शन करण्यापुरती मर्यादित आहे.

आम्ही सर्वसामान्यपणे वापरल्या जाणाऱ्या लेखा परीक्षणा प्रमाणकांना अनुसरून लेखापरिक्षण केले आहे. आम्ही अशा पध्दतीने लेखा परीक्षणाचे नियोजन करून ते पार पाडले की वरील लेखा परीक्षा प्रमाणकांवरून संस्थेची आर्थिकपत्रके ही ढोबळ प्रमाणात दोषविरहीत असल्याबद्दल सर्व साधारण खात्री यावी लेखापरीक्षणात चाचणी पध्दतीने परीक्षण रकमांचा आधारभूत जोडपत्रे आणि आर्थिक पत्रकातील प्रकटन आदी बाबीचा समावेश आहे. लेखापरीक्षणात व्यवस्थापनाने वापरलेल्या आर्थिक तत्वांचा तसेच महत्त्वपूर्ण अंदाज यांचा देखील अंर्तभाव आहे असा आम्हाला विश्वास आहे.

आम्ही सहकारी वर्षाचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक तपासले असुन अहवाल सादर करतो की आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालीलप्रमाणे जरूरी ती सर्व माहिती व तसे आम्हाला उपलब्ध झाली आहे.

आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबाचे पुस्तकाशी जुळत असून ३१.०३.२६ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती आणि नफातोटा पत्रकाच्या बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शविती आणि नफातोटा पत्रकाच्या बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शविती.

संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणार आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शविती. आमच्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा नियम व संस्थेचे पोटनियमानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

सन २०२५-२०२६ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग `**अ**` राखण्यात आलेला आहे.

**मिर्झा कोतकर आणि कं,**
**सनदी लेखापाल करिता,**

**स्थळ : नाशिक**

**दिनांक : १०/०७/२०२६**

**सी ए गालिब अंजुम मिर्झा**
**पार्टनर**
**मे.नं.१५२८१७**
FRN 141026W
**नामतालिका क्र. १०१८३२**
**जिल्हा : नाशिक**

# परिशिष्ट अ

| संस्थेचे नाव | गोदामृत अर्बन को ऑप क्रेडीट सो. लि. नाशिक |
|---|---|
| प्रशासकीय कार्यालय | शॉप नं.२६ व २७ मधुरा टॉवर उंटवाडी नाशिक |
| नोंदणी कार्यालय | एन. एस. के./एन. एस. के./आर. एस. आर./सी. आर./१५३२/२००४ |
| कार्यक्षेत्र | नाशिक तालुका नाशिक |
| ठेवी | ३१ कोटी ६३ लाख १९ हजार ३९४ रु |
| कर्ज | २३ कोटी ३६ लाख ८८ हजार ३१० रु. |
| गुंतवणूक | १३ कोटी ५ लाख ४८ हजार ५५८ रु. |
| स्वनिधी | ३ कोटी ३० लाख ७८ हजार ७५३ रु. |
| सभासद संख्या | ३८९५ |
| भागभांडवल | १ कोटी २४ लाख ७ हजार ६०० रु. |
| खेळते भांडवल | ३८ कोटी ९१लाख ३५ हजार ९०८ रु. |
| ढोबळ एन पी ए | ६.८३ % |
| निव्वळ एन पी ए | १.७७ % |
| निव्वळ नफा | ५४ लाख ८३ रु. |
| थकबाकी प्रमाण | ३.४४ % |
| सीडी रेशो | ६२.५६% |
| लाभांश | १२% |
| लेखापरीक्षण वर्ग | 'अ' |
| एकूण कर्मचारी | ६ |
| सी आर ए आर | १७.३७% |

**श्री. प्रमोद दिनकर पाटील**
चेअरमन

**श्री. नितीन मुरलीधर बोरोले**
व्हा. चेअरमन

**श्री. भागवत प्रकाश भोळे**
कार्यलक्षी संचालक

## गुणवंतांचा सत्कार

गोदामृत अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटीतर्फे आपण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करीत असतो. या वर्षी सुद्धा हा उपक्रम राबविणार आहे त्याकरिता १० वी आणि १२ वीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी मार्कशीट संस्थेमध्ये जमा करावे. १० वी व १२ वी मध्ये ज्या सभासदांच्या पाल्यांचा प्रथम क्रमांक येईल त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात येईल . सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीस सर्व संचालक मंडळातर्फे हार्दिक शुभेच्छा !!

## सभासदांना आवाहन

टीप : सभासदांनी आपल्या पाल्यांचे गुणपत्रक दि..०३/०८/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात जमा करावे, गुणानुक्रमाणे नंबर काढले जातील.

सूचना :- जे विद्यार्थी किंवा पालक सभेस हजर राहतील त्यांनाच बक्षीस देण्यात येईल. सभेनंतर संस्थेमध्ये कोणासही बक्षीस देण्यात येणार नाही

## सभासदांना आवाहन

(जे सभासद दि.०८/०८/२०२६ या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असतील त्या उपस्थित सभासदासाठी ''सस्नेह भोजनाची'' व्यवस्था करण्यात आलेली आहे. याची सभासदांनी नोंद घ्यावी.)

Marco Electricals, Nashik

MARCO ELECTRICALS

Govt.Licenced Electrical Contractors
Engineer & Suppliers

Madhav Bhole
Mob: 9420485288

N 42 /J-E-1-7-1, Bajiprabhu Nagar,
4th Scheme, CIDCO, Nashik 422008

PHOENIX Engineering

PHOENIX
Engineering

Honing, Hard turning and ID,
OD, Grinding specialist

Raghuvir Phalak
9225102235

Rahul Phalak
9028114774

21/3 In Front of Tapariya Ground MIDC,
Satpur, Nashik-422007

## आजची गुंतवणूक, भविष्याची सुरक्षितता...

## आमचे अधिकृत अल्पबचत प्रतिनिधी


श्री. महेश निवृत्ती बऱ्हाटे


सौ. योगिता भागवत भोळे


श्री. विनोद निवृत्ती बऱ्हाटे

Piyush Chaudhari, 9403479236

# Piyush Enterprises

Manufacturas

◆ Ther meforming machines ◆ Luggage testing machines
◆ Vacaam forming moulds ◆ G.D.C. Machine ◆ SPM`s

**Work- B. 236 & 237, MIDC, Malegaon, Sinnar, Nashik**

Devendra Chaudhari : 9371678363

# Piyush Services

Work ◆ Vmc, CNC Turing Job Work
◆ Wire Cuting Job Work ◆ Press Tools, Ji & T fixtures.
fabroceted Components. ◆ Injection Mould
◆ Ther moformed & Injction oulded componets./

**Gat No. 273, Kulswamini Business Center Ambad,- DGP Road, Behind Jadhav Ent. Ambad, Nashik-10 piyushrs123@rediffmail.com**

# भोळे मंगल कार्यालय

शुभम पार्क जवळ, अंबड लिंक रोड, कामटवाडा, सिडको, नाशिक

कार्यालय -०२५३-२३७३२६९, नि. २३७६०२१ मो.९८२२४३२४०६



श्री.शालीग्राम एम.भोळे
संचालक
मो.९८२२४३२४०६



सौ.रेखा एस.भोळे
संचालिका
मो.९०२८३०५७५९



डॉ.गणेश एस.भोळे
(B.A.M.S)(PGDEMS,DYA)
संचालक
मो.९८९००००२१३



डॉ.हिरल जी.भोळे
(B.A.M.S.CCYP)
संचालिका
मो.८९५६०५६६५६

निवास - ईश्वरकृपा हॉस्पिटल, भोळे मंगल कार्यालयाजवळ,अंबड लिंक रोड, कामटवाडा, नाशिक
फोन नं : २३७६०२१



रजि.नं.३५५३,नासिक | रजि.नं.महाराष्ट्र ३६४२/९४,नासिक

# सातपुडा विकास मंडळ, सिडको

प्लॉट नं. एस. एफ. १, अे. एन. एच. ई-३, भाद्रपद सेक्टर, सेंट लॉरेन्स हायस्कूलजवळ, नविन नाशिक-४२२००९

## सातपुडा विकास मंडळ, सिडको, नाशिक

### संचालक मंडळ

श्री. सुनिल वसंत पाटील - अध्यक्ष
श्री. देविदास दामू पाटील - उपाध्यक्ष
श्री. कमलाकर नामदेव इंगळे - सचिव
दिलीप तुळशिराम भोळे - खजिनदार

श्री. प्रभाकर रामकृष्ण रडे, श्री. रविंद्र वासुदेव भोळे, श्री. काशिनाथ पंढरीनाथ पाटील, श्री. लीलाधर दोधू पाटील, श्री. नितीन मुरलीधर बोरोले, श्री. दिलीप वासुदेव तळेले, श्री. यशवंत सेनू भंगाळे, श्री. राजेंद्र प्रेमचंद फेगडे, श्री. बाळकृष्ण उमाकांत अत्तरदे, सौ. कविता शरद चौधरी, सौ. वसुंधरा विजय राणे

### स्विकृत सदस्य

श्री. दत्तात्रय राजाराम कोल्हे
श्री. उल्हास चिंतामण भोळे
श्री. अजय किसन पाटील
श्री. विलास कृष्णा ढाके
श्री. धिरज दिनकर इंगळे
सौ. सुवर्णा दिलीप पाटील

### सल्लागार सदस्य

डॉ. श्री. प्रमोद हरी महाजन
आर्किटेक्ट श्री. क्षितीज धांडे
श्री. अनिल महाजन
इंजिनियर श्री. उज्वल चौधरी



संस्थेच्या प्रत्येक यशामागे ज्येष्ठ सभासदांचे मार्गदर्शन,अनुभव आणि आशीर्वाद लाभला आहे.म्हणून संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा शुभारंभ ज्येष्ठ सभासदांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात येतो.




२१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी उपस्थित संचालक मंडळ आणि संस्थेचा लेखा जोखा मांडतांना संस्थेचे कार्यलक्षी संचालक मा.श्री.भागवत प्रकाश भोळे




२१व्या वार्षिक सभेमध्ये संस्थेविषयी माहिती देत असतांना संस्थेचे चेअरमन मा.श्री.प्रमोद दिनकर पाटील



जय मल्हार पतसंस्थेचे व्हॉ.चेअरमन मा.श्री.आदरणीय कैलासराव आढाळराव पाटील यांचा सत्कार करतांना गोदामृत सोसायटीचे चेअरमन श्री.प्रमोद दिनकर पाटील







संस्थेचा सन्मान – संस्थेचा दीपस्तंभ पुरस्काराने गौरव संस्थेच्या उत्कृष्ट कार्यपद्धती,आर्थिक शिस्त आणि पारदर्शक कारभार यांची दखल घेत यावर्षी संस्थेला प्रतिष्ठेचा दीपस्तंभ पुरस्कारप्राप्त झाला आहे हा पुरस्कार संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा,संचालक मंडळाच्या दूरदृष्टीचा,कर्मचारी यांच्या समर्पित कार्याचा आणि सभासदांच्या दृढ विश्वासाचा गौरव आहे. दीपस्तंभ पुरस्कार हा संस्थेच्या उज्ज्वल कार्याचा सन्मान असून भविष्यातील अधिक यशासाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरला आहे. दीपस्तंभ पुरस्कार – संस्थेच्या गुणवत्ता, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट कार्याचा मानाचा तुरा.





आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव हीच आमच्या संस्थेची खरी ओळख आहे. समाजसेवेची भावना जपत शिक्षणाच्या प्रकाशाने जीवन उजळविण्याचा संस्थेचा हा एक छोटासा प्रयत्न आहे.याच भावनेतून संस्थेने सामाजिक उपक्रमांतर्गत म.न.पा शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुस्तके वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावण्याचा छोटासा प्रयत्न केला. मुलांच्या स्वप्नांना ज्ञानाची साथ देत, उज्ज्वल भविष्यासाठी संस्थेचे एक सामाजिक पाऊल.

ज्ञानदान हेच श्रेष्ठ दान –कारण पुस्तकांच्या प्रत्येक पानातून घडते उद्याचे यशस्वी व्यक्तिमत्त्व.





खान्देश पतसंस्थेचे चेअरमन मा.श्री.आदरणीय डॉ.चंद्रकांत महाजन आणि संचालक मंडळ यांनी गोदामृत सोसायटीस सदिच्छा भेट दिली त्या प्रसंगाचे क्षणचित्र






गुणवंत विद्यार्थी आणि पालक सत्कार आजचा गुणवंत विद्यार्थी म्हणजे उद्याचा सक्षम नागरिक त्यांच्या यशाचा गौरव करणे हीच समाजाप्रती संस्थेची खरी बांधिलकी आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे यश हा पालकांच्या त्यागाचा आणि संस्काराचा विजय आहे.म्हणून आपली संस्था गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांचा सुद्धा सत्कार करीत असते.

## गोदामृत संस्थेच्या ठेवींच्या प्रगतीचा वाढता आलेख



# गोदामृत अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.

शॉप नं. २६,२७ मधुरा टॉवर उंटवाडी नाशिक-८, फोन : ०२५३-२९७९३४०,९४०३४७९३४०

आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी संस्थेस एक वेळेस अवश्य भेट द्या

## कर्जाचे व्याजदर

स्वप्न तुमची,

साथ आमची

* नियम व अटी लागू



गृह कर्ज १२.५%





तारण कर्ज १३%



वाहन कर्ज १३%



सोने तारण कर्ज १०%





वैयक्तिक कर्ज १५%

## संस्थेचे ठेवीचे आकर्षक व्याजदर

| कालावधी | सर्वसाधारण | जेष्ठ नागरिक, अपंग, विधवा, व ५ लाखावरील विशेष योजना |
|---|---|---|
| ३० ते ४५ दिवस | ५.५% | ६% |
| ४६ ते ९० दिवस | ६% | ६.५% |
| ९१ ते १८० दिवस | ६.५% | ७% |
| १८१ ते ३६५ दिवस | ७.५% | ८% |
| १२ महिने | ८.५% | ९% |
| २४ महिने | ९% | ९.५% |
| ३६ महिने | ९.५% | १०% |

**लखपती ठेव योजना**
१३०० रू.दरमहा
६० महिने भरा.
१ लाख रू.
**मिळवा.**

## मासिक उत्पन्न ठेव योजना

| कालावधी | टक्केवारी | १ लाख | ज्येष्ठ नागरिक, अपंग, विधवा व ५ लाखावरील विशेष योजना | १ लाख | ५ लाख |
|---|---|---|---|---|---|
| १ वर्ष | ७.७५% | ६४२ | ८.२५% | ६८२ | ३४१४ |
| २ वर्ष | ८.००% | ६६२ | ८.५०% | ७०३ | ३५१७ |
| ३ वर्ष | ८.५०% | ७०३ | ९.००% | ७४४ | ३७२२ |

**आवर्त ठेव** : १ वर्ष - ८.५%, २ वर्ष-९%, ३ वर्ष- ९.५%

**दामदुप्पट ठेव** ८८ महिने (सर्वसाधारण)

**दामदुप्पट ठेव**

८४ महिने (जेष्ठ नागरिक, अपंग, विधवा)

प्रति

श्री./सौ......................................................

.............................................................

.............................................................

प्रकाशक : श्री. प्रमोद दिनकर पाटील (चेअरमन)

**गोदामृत अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.**